नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०८/२०२५ ( गुरूवार )

---

## पोस्टे मौदा हद्दीत मोबाईल वरून सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीतांविरूध्द नविन कायदा भारतीय न्याय संहीता २०२३ मधील किरकोळ संघटीत गुन्हेगारी चे कलम ११२ अन्वये करण्यात आली कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा :–** दिनांक २१/०८/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, मौदा येथे काही आरोपी हे मोबाईल वरून सट्टापट्टीचे आकडे घेवुन लोकांकडुन पैसे घेवुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौदा पोलसांनी खालील प्रमाणे दोन गुन्हे नोंद केले आहे.

**कारवाई क्रं १ :–** गोपनीय माहितीच्या आधारे मौजा शिवाजी चौक, मौदा येथे पोलीसांनी सट्टीपट्टी चालविणाऱ्यावर धाड टाकली असता १) प्रशिक ईश्वरदास बोरकर, वय २७ वर्ष, रा. मटन मार्केट मौदा, हा मोबाईल वर आकडे घेवुन सट्टीपट्टी चालवितांना मिळुन आला. आरोपीला अधिक विचारपुस केली असता आरोपी क्रं २) राहूल घोडमारे, रा. लापका, ता. मौदा, ३) ज्ञानेश्वर अवचट, रा. मारोडी ता. मौदा आणि ४) रवी डोगरे, रा. मौदा, यांच्या सांगण्यावरून तो सट्टापट्टी चालवित असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष रोख रक्कम ५३० /– रूपये, सट्टापट्टीचे आकडे टाईप करण्याकरीता तसेच आकडे घेण्याकारीता वापरलेला एक ॲन्ड्रॉईड मोबाईल किंमती १०,०००/– रूपये असा एकुण १०,५३०/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्रं २ :–** गोपनीय माहितीच्या आधारे किशोर बार, जवळ मौदा येथे पोलीसांनी सट्टीपट्टी चालविणाऱ्यावर धाड टाकली असता आरोपी नामे १) राहूल दशरथ घोडमारे, वय ३२ वर्ष, रा. लापका, ता. मौदा हा मोबाईल वर आकडे घेवुन सट्टीपट्टी चालवित असतांना

मिळुन आला. आरोपीला अधिक विचारपुस केली असता आरोपी क्रं २) ज्ञानेश्वर अवचट रा. मारोडी ता. मौदा,३)रवी डोगरे, रा. मौदा यांच्यासह मिळुन तो सट्टापट्टी चालवित असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम ७,३०० /— रूपये, सटटपटटी आकडे टाईप करण्याकरीता तसेच आकडे घेण्याकारीता वापरलेला एक ॲपल मोबाईल, एक ॲन्ड्रॉईड मोबाईल किंमती ३०,०००/— रूपये आणि इतर साहीत्य असा एकुण ३७,३०५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**नमुद आरोपीतांच्या विरूद्ध कलम १२ (अ), महाराष्ट्र जुगार अधिनियम, ४९ भा.न्या.सं अन्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे. यामध्ये प्रत्यक्ष सट्टापट्टी चालवणारे आरोपी आणि त्यांना सट्टापट्टी चालविण्यास लावणारे आरोपी हे संघटीतपणे अवैधरित्या सट्टापट्टीचे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात मौदा पोलीसांनी भारतीय न्याय संहीता कलम ११२ ( किरकोळ संघटीत गुन्हेगारी ) हे कलम वाढ करणे बाबत प्रस्ताव श्री संतोष गायकवाड ,उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या कडे सादर केला आहे.**

## अवैधरित्या मोहफुल गावठी हातभट्टीच्या दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक २०/०८/२०२५ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरीत्या मोहफुल हातभट्टी गावठी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा कुही चांपा वरून नागपुर कडे जाणाऱ्या रोडवर नाकाबंदी केली असता ॲक्टीव्हा मोपेड क्रमांक एम एच ४९ आर ९९७३ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यावर दोन कॅनमध्ये मोहफुल हातभट्टी गावठी दारू मिळुन आली. आरोपी नामे १) मलिक खान बशिर खान, वय २६ वर्ष, रा.जुनी मंगळवारी, नागपुर ता. जि. नागपुर २) रवी अर्जुन जोगदळे, वय ४२ वर्ष, रा. आर बी बार चे मागे, वाठोळा, नागपुर हे अवैधरीत्या दारूची वाहतुक करतांना मिळुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष ८० लिटर मोहफुल हातभट्टीची दारू किंमती ८०००/— रूपये आणि**

**२) ॲक्टीव्हा मोपेड क्रमांक एम. एच. ४९ आर. ९९७३ किंमती ५०,००० /— रूपये असा एकुण ५८,०००/— रूपयांचा माल मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कुही येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासले आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २०/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २१/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री दिपक अग्रवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत बोरी टाउन परीसरातील गोदावरी नगर, व्हिडीओ चौक येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि एम.आय.डी.सी. चौक येथे नाकाबंदी केली. पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत गंगापुर झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि गार्डन चौक येथे नाकाबंदी केली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री दिपक अग्रवाल यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार हजर होते.


realme
Shot on realme X2



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने